रजनिश सेठ
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त असलेली एकुण ५२९७ पदे भरण्याकरीता सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदरची भरती प्रक्रिया पूर्ण होवून कर्मचारी प्रशिक्षण घेत आहेत.

सन २०२० मध्ये पोलीस शिपाई पदात रिक्त असणारी एकुण ७२३१ पदे भरती प्रक्रियेने भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यापैकी नक्षलग्रस्त भागातील अत्यावश्यक असणारी पोलीस अधीक्षक, गडचिरोली येथील पोलीस शिपाई २८९ पदे व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १३, वडसा देसाईगंज, गडचिरोली येथील ५४ पदे भरण्याबाबत शासनाने विशेष बाब म्हणून सन २०१९ च्या भरतीसोबत भरण्यास मान्यता दिली होती. त्यामुळे ती पदे वगळून उर्वरित ६८८८ इतके पदे भरावयाची आहेत. Application Processing System तयार करण्याचे काम महाराष्ट्र शासनाच्या महाआयटी विभागास देण्यात आले असून, सदरचे कामकाज सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण झाल्यानंतर पोलीस शिपाई भरती प्रक्रिया माहे ऑक्टोबर-२०२२ च्या पहिल्या आठवड्यात सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०२१ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त झालेल्या पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

(घटकनिहाय रिक्त पदांची माहिती यासोबत जोडली आहे.)

| अ.क्र. | वर्ष | पोलीस शिपाई | चालक पोलीस शिपाई | सशस्त्र पोलीस शिपाई | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | २०२१ | १०४०४ | १४०१ | ७२२ | १२५२७ |

सन २०१९ मध्ये भरती झालेले नवप्रविष्ठ पोलीस शिपाई हे विविध पोलीस प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असून त्यांचे प्रशिक्षण माहे-डिसेंबर, २०२२ मध्ये पूर्ण होणार आहे. त्यानंतर सन २०२० मधील रिक्त पदे भरण्याकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येवून, निवड झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार आहे. त्यांचे प्रशिक्षण २०२३ ऑक्टोबर, नोव्हेंबर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सन २०२१ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त झालेली एकुण १२५२७ पदे भरण्याकरीता शासनाची मान्यता मिळाल्यास सदरची भरती प्रक्रिया माहे मार्च-२०२३ मध्ये सुरु करणे प्रस्तावित आहे.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, सन २०२१ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त झालेली १२५२७ पदे भरण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी.

आपला

(रजनिश सेठ)

O/C
6/9/2022

श्री. आनंद लिमये,
अपर मुख्य सचिव,
गृह विभाग, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई.